# 1 स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामीण)

73 व्या घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

उ.1 लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी आणि देशाच्या ग्रामीण विकासासाठी बलवंतराय मेहता समितीने त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेची शिफारस केली. या शिफारशीच्या आधारेच देशात पहिल्यांदा राजस्थान येथे पंचायतराज व्यवस्था सुरु करण्यात आली. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्मितीसाठी वसंतराव नाईक समितीची स्थापना करण्यात आली. 15 मार्च 1961 ला वसंतराव नाईक समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला. त्यानुसार 5 मार्च 1962 रोजी भारताच्या राष्ट्रपतीकडून याला मान्यता देण्यात आली. 1 मे 1962 रोजी महाराष्ट्रात पंचायत राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार कारभार चालतो. महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्था त्रिस्तरीय स्वरूपाची आहे. या पंचायत राज व्यवस्थेतील लोकप्रतिनिधींची निवड प्रत्यक्ष निवडणुकीतून होते. अलिकडे महाराष्ट्रात सरपंचाची निवड थेट जनतेतून होत आहे. पंचायत राजसंस्थेचा इतिहास समजून घेताना 1957 च्या बलवंतराय मेहता समिती 1960 च्या वसंतराव नाईक समिती यांच्यासह 1960 ची व्ही. टी कृष्णमाचारी समिती, 1965 ची संतनाम समिती, 1960 ची जैन समिती, 1977 ची अशोक मेहता समिती, 1985 ची जी. व्ही. के. राव समिती यासह बोंगिरवार आणि पी. बी. पाटील समिती यासर्व समित्या महत्वाच्या आहेत.

यासर्व समित्यांनी पंचायतराज संस्थेविषयी अभ्यास करुन अनेक शिफारशी सुचविल्या पंचायत राज संस्थेशी संबंधित भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वात तरतूद करण्यात आली. मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी करण्यासाठी घटनात्म

व बंधन शासनकर्त्यांवर नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना राजकीय आर्थिक स्वायत्तता व अधिकार या बाबतच्या मर्यादा होत्या. या मर्यादा नष्ट व्हाव्यात व पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळावा म्हणून 1993 साली 73 वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्तीनुसार भारतीय राज्य घटनेतील चौथ्या भागातील मार्गदर्शक तत्वातील 40 या कलमाला व्यवहारात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. 73 व्या घटना दुरुस्ती खालील तरतूद करण्यात आली. या तरतूदींचा उल्लेख 73 व्या घटना दुरुस्तीची वैशिष्ट्ये म्हणून केला जातो.

1) विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण :-

या घटना दुरुस्तीनुसार संविधानाच्या 243 व्या कलमात पंचायतराज व्यवस्थेची तरतूद करण्यात आली. या घटना दुरुस्तीने पंचायतराज संस्थेशी संबंधित विविध संकल्पनांचा अर्थ स्पष्ट केला कारण त्या या संकल्पना विषयी गोंधळ निर्माण होऊ नये.

2) त्रिस्तरीय रचना :-

या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेत त्रिस्तरीय रचना स्विकारण्यात आली ग्रामपंचायत गाव, पंचायत समिती - तालुका व जिल्हा परिषद - जिल्हा असे एकूण तीन स्तर पंचायत समितीचे असतील असे 73 वी घटना दुरुस्ती सांगते.

3) ग्रामसभा :-

कलम 243 (अ) नुसार ग्रामसभेच्या स्थापना व अधिकाराची तरतूद केली आहे. या तरतूदी नुसार प्रत्येक गावात

ग्रामसभेचे आयोजन करावे. मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येकाचा या ग्रामसभेत सहभाग असावा.

4) **आरक्षणाची तरतूद :-**

कलम 243(ड) नूसार पंचायतराज व्यवस्थेत आरक्षणाची तरतूद करण्यात आली. यानूसार अनुसुचित जाती (SC), अनुसुचित जमाती (ST) यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली. इतर मागास प्रवर्गातील लोकांसाठी 27% जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. आणि महिलांसाठी एकूण सदस्य संख्येच्या $\frac{1}{3}$ म्हणजेच 33% जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. अलिकडे यात दुरुस्ती करून महिलासाठी 50% आरक्षणाची तरतूद स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 73 व्या घटना दुरुस्तीनूसार जाहिर केलेल्या आरक्षणाचा फायदा सर्वच प्रवर्गाला मिळावा. यासाठी आरक्षण वारंवार बदलत असते.

5) **कार्यकाळ :-**

या घटना दुरुस्तीने कलम 243(इ) नूसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाचा कार्यकाळ 5 वर्षाचा राहील असे जाहीर केले.

6) **अधिकार व कार्ये :-**

73 व्या घटना दुरुस्तीनूसार ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकार व कार्य जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. कलम 243(ग) नूसार ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेचे अधिकार व कार्ये निश्चित करण्यात आले.

7) लेखा परिक्षण :-

73 व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांचे कार्य व जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी निश्चित स्वरुपाच्या निधीची तरतूद केली आहे. शासनाने दिलेला हा निधी त्याचा हिशोब व्यवस्थीतपणे स्थानिक स्वराज्य संस्थांना ठेवावा लागतो. या हिशोबाची व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची तपासणी करण्याचा अधिकार व तरतूद या घटना दुरुस्तीने केली आहे.

8) निवडणूका :-

73 व्या घटना दुरुस्तीने प्रत्येक घटकराज्यातील पंचायत राज संस्थाच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य निर्वाचन आयोगाच स्थापना करण्याची तरतूद केली आहे. या आयोगामार्फतच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होतात.

9) वित्त आयोगाची स्थापना :-

73 व्या घटना दुरुस्तीनुसार घटकराज्याच्या राज्य पाल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक समिक्षणासाठी दर पाच वर्षाला एका वित्त आयोगामार्फतच स्थानिक स्वराज संस्था विकास निधी शासनाला कळवला जातो. या निधीचे समिक्षण याच आयोगामार्फत केले जाते.

## * जिल्हा परिषद :-

जिल्हा परिषद पंचायतराज व्यवस्थेतील शिखर संस्था म्हणून ओळखली जाते. ग्रामीण भागाच्या विकासाचा प्रभावी मार्ग म्हणजे जिल्हा परिषद. जिल्हा परिषद राजकीय नेतृत्वाच्या उदयाची प्राथमिक धडे देणारी संस्था आहे. जिल्हा परिषद देशाचे भविष्यातील नेतृत्व घडविणारी कार्यशाळा आहे. जिल्हा परिषद छोटी संसद म्हणून संबोधली जाते. ग्रामीण भागाच्या विकासाबाबतचे शासनाने ठरतलेले सर्व नियोजन, धोरण व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची मुख्य जबाबदारी जिल्हा परिषदेवर असते.

### - रचना :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम दुसऱ्या प्रकरणानुसार जिल्हा परिषदेची स्थापना केली जाते. महाराष्ट्रात 1 मे 1962 पासून जिल्हा परिषदेची स्थापना केली जाते 73 व्या घटना दुरुस्तीनुसार आणि वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदेची स्थापना केली जाते. जिल्हा परिषदेची रचना खालील मुद्दयांच्या आधारे समजून घेता येते.

### - पात्रता :-

जिल्हा परिषदेचा सदस्य होण्यासाठी खालील पात्रता लागतात.

1) तो भारताचा नागरिक असावा.
2) वयाची 21 वर्षे वय पूर्ण केलेली असावी.
3) जिल्ह्यातील कोणत्याही जिल्हा परिषद मतदार संघात मतदार म्हणून त्याचे नाव असावे.
4) शासकीय लाभाच्या कोणत्याही पदावर नसावा.

5) वेडा व दिवाळखोर असू नये.
6) महाराष्ट्र शासन व निवडणूक आयोगाने ठरविलेल्या अटींची पूर्तता करणारा असावा.

- बडतर्फी :-

जिल्हा परिषदेवर निवडून आलेल्या सदस्याचे सदस्यत्व खालील कारणास्तव रद्द होऊ शकते.

1) त्याने स्वतः आपल्या पदाचा जिल्हा परिषद अध्यक्षा राजीनामा दिला असल्यास.
2) त्याचा मृत्यू झाला असल्यास.
3) जिल्हा परिषदेच्या $\frac{2}{3}$ सभासदांनी बहुमताने एखाद्या सदस्याच्या गैर वर्तनाची राज्यशासनाकडे तक्रार केल्यास त्याला बडतर्फ केले जाते.
4) एखादा सदस्य परवानगी न घेता परिषदेच्या सभांना गैरहजर राहत असल्यास आयुक्ताला त्या व्यक्तिला पदारून काढून टाकण्याचा अधिकार आहे.

- निवडणूका :-

जिल्हा परिषद बरखास्त झाल्यानंतर 6 महिन्याच्या आत जिल्हा परिषदेची फेर निवडणूक घ्यावी लागते.

- जिल्हा परिषदेचे आरक्षण :-

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा परिषदेत त्या त्या प्रवर्गातील लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा आरक्षित ठेवल्या जातात. सदरील आरक्षण मतदार संघ निहाय बदलत जाते. सध्या 50% राखीव जागा महिलांसाठी आरक्षित असतात. तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षण असते.

- अध्यक्ष व उपाध्यक्ष :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमानुसार (1961) जिल्हा परिषदेत प्रत्यक्ष निवडून आलेल्या सदस्यापैकी एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष जिल्हा परिषदेच्या पहिल्याच सभेत निवडले जातात.

- समित्या :-

जिल्हा परिषदेला ग्रामीण भागाच्या विकास करता यावा म्हणून खालील समित्या ठरीत केल्या जातात:

1) स्थायी समिती
2) अर्थविषयक समिती
3) कृषी समिती
4) बांधकाम समिती
5) समाजकल्याण समिती
6) शिक्षण समिती
7) आरोग्य समिती
8) महिला व बालकल्याण समिती
9) पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती
10) जलसंधारण व पाणीपुरवठा समिती

वरील समित्यांपैकी स्थायी समिती जिल्हा परिषदेची कॅबिनेट समजले जाते. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष हा स्थायी स्थायी समितीचा अध्यक्ष असतो. यासर्व समित्यात जिल्हा परिषदेचे सभासद हेच सदस्य असतात.

- जिल्हापरिषदेचे उत्पन्न :-

जिल्हा परिषदेला विकास कामासाठी आर्थिक निधीची आवश्यकता असते या आर्थिक निधीची तरतूद करांची वसूली व राज्यशासनाच्या अनुदानातून होते. परंतु

जिल्हा परिषदेला हे सर्व अनुदान नियमानूसारच खर्च करावे लागते व त्याचा हिशोब ही ठेवावी लागतो.

- <u>जिल्हा परिषदेचे कार्य</u> :-

संपुर्ण जिल्हा हे जिल्हा परिषदेचे कार्यक्षेत्र असते त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मध्ये जिल्हा परिषदेचे खालील कार्य सांगितली आहे.

1) कृषी विषयक शासनाच्या योजना ग्रामीण भागापर्यंत पोहचवणे.

2) पिक संरक्षण, पिकांची पाहणी, सुधारीत बियाणे याबाबतची माहिती शेतकऱ्यांना देणे.

3) ग्रामीण भागात पशुसंवर्धनाची माहिती जनतेला देणे.

4) पशुच्या आरोग्यासाठी पशुचिकित्सालय काढणे.

5) शेतीस पूरक असणाऱ्या विविध जोडधंदयाची माहिती उदा :- वराह पालन, मत्स्य पालन, शेळी पालन, कुकुट पालन रेशीम किड्यांचा व्यवसाय, गांडूळ खत, मशरूम इत्यादी व्यवसायाचे प्रशिक्षण व प्रोत्साहन दिले जाते.

6) ग्रामीण भागातील गायरान पडित जमीन इत्यादी ठिकाणी वृक्ष लागवड करणे.

7) आपल्या कार्यक्षेत्रा अंतर्गत असलेल्या जंगलाचे संरक्षण करणे.

8) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे उदा, वसतीगृह बांधणे.

9) आंतरजातीय विवाहासाठी प्रयत्न करणे किंवा प्रोत्साहन देणे.

10) मागासवर्गीय जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे.

11) प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षण मोफत द्यावे.

12) ग्रामीण भागात शाळा स्थापन करणे.
13) या शाळांना शैक्षणिक सामग्री उपलब्ध करून देणे.
14) दळण वळण सोयीचे व्हावे. म्हणून पक्क्या रस्त्यांची बांधणी करणे. आवश्यक तेथे पुलांची उभारणी करणे.
15) शेतीसाठी पाण्याची सोय व्हावी म्हणून पाटबंधारे व सिंचनाच्या इतर सुविधा राबवणे.

वरील कार्याशिवाय जिल्हापरिषदेला साप्ताहिक बाजाराची व्यवस्था, विश्रांतीगृहे, तिर्थक्षेत्रांची व्यवस्था, अर्थ पुरविण्यासाठी बँकांची स्थापना आणि पंचायत समिती व ग्रामपंचायतीत समन्वय स्थापन करणे. वरील सर्व कार्य करण्यासाठीचे महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद अधिनियम 1961, 73वी घटना दुरुस्ती यासह शासनाच्या अनेक निर्णयांनी पुरक अधिकार जिल्हा परिषदेला दिले आहेत.

* **पंचायत समिती :-**

पंचायत राज व्यवस्थेतील पंचायत समिती हा जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. पंचायत समिती जिल्हा परिषद व ग्राम पंचायतीत समन्वय साधणारी महत्त्वाची संस्था आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 56 नुसार प्रत्येक तालुक्यासाठी एका पंचायत समितीची निर्मिती केली आहे. महाराष्ट्रातील पंचायत समितीची रचना व कार्याची तरतूद 1961 च्या अधिनियमात केली आहे. या अधिनियमानुसार पंचायत समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.

1) **निवड :-**

पंचायत समितीच्या सर्व सभासदांची निवड गुप्त प्रौढ मतदान पद्धतीने केली जाते.

2) **पात्रता :-**

पंचायत समितीचा सभासद म्हणून निवडून येण्यासाठी खालील पात्रता पूर्ण करावी लागते.

1) तो भारताचा नागरिक असावा.
2) वयाची 21 वर्षे पूर्ण केलेली असावी.
3) पंचायत समितीच्या कोणत्याही मतदार संघात मतदार म्हणून त्याचे नाव असावे.
4) संबंधित व्यक्ती कोणत्याही लाभाच्या पदावर नसावी.
5) तो थकबाकीदार नसावा.
6) तो वेडा किंवा पागल नसावा.
7) शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटींची पूर्तता करणारा असावा.

3) कार्यकाळ :-

पंचायत समितीचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. परंतु राज्यसरकार गैरकारभारामुळे पंचायत समितीला बरखास्त करू शकतो. अशा बरखास्त झालेल्या पंचायत समितीत 6 महिन्यांच्या आत पुन्हा निवडणूका घ्याव्या लागतात.

4) आरक्षण :-

~~सभापती~~ 73 व्या घटना दुरुस्तीनूसार आणि महाराष्ट्र शासनाने त्यात केलेल्या सुधारणेनूसार अनुसूचित जाती, जमाती इतर मागास प्रवर्ग आणि महिलांसाठी आरक्षण ठेवले जाते.

5) सभापती व उपसभापती :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नूसार प्रत्येक पंचायत समितीत एका सदस्याची सभापती म्हणून निवड केली जाते. तर त्याला मदत करण्यासाठी एकाची उपसभापती म्हणून निवड केली जाते.

वरील प्रमाणे पंचायत समितीची रचना करण्यात आली.

* पंचायत समितीचे कार्य :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नूसार पंचायत समितीचे कार्य निश्चित करण्यात आले या कार्याबाबत 73 वी घटना दुरुस्ती व महाराष्ट्र शासनाच्या अनेक कायद्याने ~~स्प~~ स्पष्टीकरण दिले आहे. पंचायत समिती शासकीय योजनांना

तालुका स्तरापर्यंत पोहचवणारी महत्वाची संस्था आहे. महाराष्ट्र शासन या संस्थेच्या मदतीने तालुका स्तरावर लोकांचे प्रश्न सोडविते. या प्रश्नांची सोडवणूक करण्यास पंचायत समिती खालील कार्य करते.

1) आपल्या कार्यक्षेत्रातील भागाच्या (ग्रामीण) विकासाचा आराखडा तयार करणे.
2) शासनाकडून विकास योजनासाठी अनुदान मिळवणे.
3) ग्रामीण भागातील विकास योजनांना अनुदान उपलब्ध करून देणे.
4) जिल्हा परिषदेच्या विकास योजना आपल्या कार्यक्षेत्रा राबविणे.
5) कृषी व पशुसंवर्धनांचे कार्य करणे.
6) कृषी व समाज कल्याणाशी संबंधित कार्य करणे.
7) आपल्या कार्यक्षेत्रातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेऊन त्यांना आरोग्य विषयक सुविधा पुरविणे.
8) आपल्या कार्यक्षेत्रातील पाल्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे.
9) दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करणे.

या शिवाय पंचायत समितीला सामुहीक विकास गृहनिर्माण यासारखे समाज उपयोगी व विकास भिमुख कार्य करावे लागते. पंचायत समिती या सर्व कार्याचे पालन प्रभावीपणे करते. या सर्व कार्याची व्यवस्थित अंमलबजावणी व्हावी म्हणून पंचायत समिती खालील समित्या नियुक्त करते.

उदा, रोजगार हमी योजना समिती, जवाहर रोजगार समिती सरपंचाची समिती, समन्वय समिती, ग्रामीण विकास लाभार्थी समिती, क्रिडा समिती, अन्नधान्य वितरण समिती, पंचायत समिती पंचायतराज

व्यवस्थेतील मध्यवर्ती संस्था आहे म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेत या संस्थेचे महत्त्व दिसून येते.

## * ग्रामपंचायत :-

घटक राज्यांना ग्रामपंचायतीची स्थापना करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेतील कलम ५० नुसार देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतूदीचा आधार घेऊन स्वातंत्र्यानंतर अनेक राज्यांनी ग्रामपंचायतीची स्थापना केली. स्वातंत्र्या अगोदर ग्रामपंचायतीची स्थापना रचना व कार्याबाबत 1920 ला ग्रामपंचायत कायदा बनविण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर ग्रामपंचायतीसाठी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 तयार करण्यात आला. याच कायद्यानुसार महाराष्ट्रात ग्रामपंचायतीची स्थापना करुन त्यात सुधारणा करण्यात आल्या.

## * ग्रामपंचायतीची रचना :-

### 1) पात्रता :-

ग्रामपंचायतीचा सदस्य होण्यासाठी खालील पात्रता पूर्ण करावी लागते.

1) भारताचा नागरिक असावा.
2) वयाचे 21 वर्ष पूर्ण केलेली असावी.
3) गावाच्या मतदार यादीत मतदार म्हणून नाव असावे.
4) संबंधित व्यक्ती शासकीय लाभाच्या पदावर नसावी.
5) ज्या व्यक्तिवर न्यायालय प्रक्रियेतून गुन्हा सिद्ध झाला. अशा व्यक्तिला निवडणूक लढवता येत नाही

२) राखीव जागा :-

गावाच्या लोकसंख्येनुसार अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती यांच्यासाठी काही जागा राखीव असतात. महिलांसाठी 50% जागांचे आरक्षण असते. इतर मागास प्रवर्गासाठी 27% आरक्षित जागा असतात.

3) निवडणूक प्रक्रिया :-

ग्रामपंचायतीचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी शासनाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणूका पार पाडण्यात पार पाडतात. या निवडणूकीत गुप्त व प्रौढ मतदान पद्धतीचा वापर केला जातो.

४) सरपंच :-

महाराष्ट्र शासनाने 2017 मध्ये केलेल्या बदलानुसार ग्रामपंचायतीत सरपंचाची निवड प्रत्यक्ष जनतेतून होत आहे. सरपंचाच्या निवडीसाठी महिला इतर मागास प्रवर्ग अनुसूचित जाती व जमातींचे आरक्षण असते

5) कार्यकाळ :-

ग्रामपंचायतीचा कार्यकाळ ग्रामपंचायतीच्या पहिल्या सभेपासून पाच वर्षाचा असतो.

6) बडतर्फी :-

महाराष्ट्रातील कोणत्याही ग्रामपंचायतीचे मदतपूर्व विसर्जन करण्याचा अधिकार राज्यशासनाला आहे. सदस्यांचे गैरवर्तन, कामातील दिरंगाई, कामातील निष्काळजीपणा, ~~भ्रष्टा~~ भ्रष्टाचार अशा अनेक कारणावरून ग्रामपंचायतीच्या सभासदांना निष्काशीत करता येते.

* ग्रामपंचायतीचे कार्य :-

प्रत्येक ग्रामपंचायत ग्रामीण भागाच्या विकासाला केंद्रबिंदू मानून काम करत असते. मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या पहिला अनुसूचित ग्रामपंचायतीने करावयाच्या कार्याची यादी दिली आहे. या यादीतील सर्व विषयावर कार्य करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला असतो. ग्रामपंचायतीचे कार्य खालील भागात विभागलेले आहे,

1) कृषी विषयक कार्य
2) पशुसंवर्धनाचे कार्य
3) वनविषयक कार्य
4) सामाजिक कल्याणाचे कार्य
5) शैक्षणिक कार्य
6) आरोग्यविषयक कार्य
7) बांधकाम विषयक कार्य
8) जलव्यवस्थापनाचे कार्य
9) सहकार विषयक कार्य
10) प्रशासकीय कार्य व संरक्षक विषयक कार्य.

वरील विभागामार्फत प्रत्येक ग्रामपंचायत गावाच्या विकासासाठी कार्य करते. ग्रामपंचायतीचे वरील विभागाचे कार्य सविस्तरपणे खालीलप्रमाणे सांगता येते.

1) ~~सेती~~ शेतीविषयक योजनांची माहिती देणे.
2) गायरान व पडीत जमीन शासनाच्या परवानगीने लागवडीखाली आणणे.
3) जनावरांचे आरोग्य सुधारणे.
4) ग्रामीण भागातील जंगल वाढवणे व त्याचे संवर्धन करणे.
5) अपंग, निराधार व कमकुवत व्यक्तिंना सहकार्य करणे

6) दारुबंदी अस्पृश्यता निवारण, एड्स जनजागृती अभियान राबवून लोकांना जागरुक करणे.
7) गावातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेणे.
8) सार्वजनिक शौचालयाची निर्मिती करणे.
9) स्मशान भूमीची व्यवस्था करणे.
10) सार्वजनिक इमारतीची निगा ठेवणे.
11) अवैध बांधकाम रोखणे.
12) बांधकामाचा परवाना देणे.
13) सार्वजनिक जागेचा वापर समाज व राष्ट्र उपयोगी कार्यासाठी करणे.
14) गावात सांडपाण्याची व्यवस्था करणे.
15) गावात विजेची व्यवस्था करणे.
16) सहकारी शेतीची संकल्पना राबविणे.
17) ग्रामपंचायतीचा अभिलेख तयार करणे.
18) गावातील प्रत्येक घराला घर क्रमांक देणे.
19) गावातील जमीनींचे मोजमाप करुन त्याची नोंद ठेवणे
20) गावातील प्रत्येक मालमत्तेचा कर निश्चित करणे.
21) गावातील प्रत्येक मालमत्ता धारकाकडून कर वसूल करणे
22) गाव पातळीवर सार्वजनिक उत्सवांचे आयोजन करणे.

अशा प्रकारे ग्रामपंचायतीला वरील सर्व काम करावे लागतात ग्रामपंचायत सदस्य, सरपंच व ग्रामसेवक यांच्या समन्वयातून ग्रामपंचायत वरील कामे करु शकते. वरील सर्व विकास कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीला ग्रामनिधी, शासकीय अनुदाने व कर आकारुन मिळणाऱ्या उत्पन्नाची मदत घ्यावी लागते.